# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ४१७-२०२४** **दिनांक-०९/११/२०२४**

## " विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने गस्ती दरम्यान कोटयावधी रुपयांची रोख रक्कम हस्तगत "

-------ooooo-------

दिनांक ०७/११/२०२४ रोजी विधानसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष -३ विरार यांना गस्त दरम्यान नालासोपारा पश्चिम, सिविक सेंन्टर जवळ सि.एम.एस. कनेक्टींग कॉमर्स कंपनीचे ए.टी.एम. कॅश वाहतुक करणारे वाहन क्रमांक एम.एच. ४३ बि.एक्स. ५६४३ हि गाडी नालासोपारा पश्चिम, सिविक सेंन्टर जवळ रस्त्याचे कडे उभी असलेली आढळुन आल्याने १२.५५ वाजता सदर वाहनात असलेले १) जावेद इक्बाल मोहम्मद शफी धंदा- चालक (रिअल सिक्युरेटी सर्विसेस) रा. जामा मजिद जवळ, गोरेगाव पुर्व, २) रोशन जगत सिंग धंदा - कॅश ऑफिसर (सि.एम.एस. कनेक्टींग कॉमर्स) रा. चंदनसार रोड, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर. ३) दिपक पांडुरंग मोडक धंदा - कॅश ऑफिसर (सि.एम.एस. कनेक्टींग कॉमर्स) रा.फुलपाडा, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर. ४) नजिर शफिक पठान धंदा- सुरक्षा रक्षक (होम सिक्युरेटी सर्विसेस ) रा.मालवणी पश्चिम, मुंबई ५) भगवंता फुलचंद निशाद धंदा- सुरक्षा रक्षक (रिअल सिक्युरेटी सर्विसेस ) रा. कामा इस्टेट, गोरेगाव पुर्व, मुंबई. यांचे कडे विधानसभा निवडणुक २०२४ चे आचार संहीते दरम्यान उपरोक्त कॅश वाहतुकी बाबत कागदपत्रांची विचारणा केली असता सदर वाहनातील कॅश ऑफिसर यांनी सादर केलेल्या कागदपत्रे व वाहनातील रोख रकमेमध्ये तफावत आढळुन आल्याने सविस्तर पंचनामा करुन ५००, २००, १०० रु दराच्या भारतीय चलनी नोटा एकुण ३,०४,५०,०००/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आली आहे.

सदर जप्त रकमेची पडताळणी होणेकामी आयकर विभाग, पालघर यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच मा. न्यायदंडाधीकारी सो., वसई न्यायालय व मा. निवडणुक निर्णय अधिकारी सो., १३२ नालासोपारा विधानसभा मतदारसंघ, पालघर यांना सदर घटने बाबत अहवाल सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोहवा/मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, तुषार दळवी, मनोहर तारडे, आतिष पवार, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांनी पार पाडली आहे.

-------ooooo-------